दिनांक :    .१.२०२०

**प्रति,**

**मा. परिवहन मंत्री,**

**आंध्रप्रदेश**

**विषय : मकरसंक्रांतीनिमित्त होणारी बस तिकिटांमधील दरवाढ त्वरित रहित करण्याविषयी....**

महोदय,

आंध्रप्रदेश येथील प्रशासनाने मकरसंक्रांतीच्या काळात भाविकांची गर्दीमुळे गैरसोय होऊ नये म्हणून ठिकठिकाणी जाण्यासाठी अधिक बसगाड्या सोडण्याची व्यवस्था केली आहे; मात्र त्यासाठी तिकीट दरात ५० टक्के भाडेवाढ करण्यात आली आहे. गतवर्षीही अशाच प्रकारे भाडेवाढ करण्यात आली होती.

शासन एकीकडे हज येथे धार्मिक यात्रा करण्यासाठी मुसलमान बांधवांना शेकडो कोटी रुपयांची सवलत देत अल्प खर्चात विमानप्रवासाची सोय, विशेष वैद्यकीय सुविधा आणि त्यांना सरकारी खर्चाने पर्यायाने बहुसंख्यांक हिंदूंच्या कररूपाने जमा झालेल्या पैशाने हज हाऊस बांधून देते. दुसरीकडे हिंदूंच्या सण आणि धार्मिक उत्सव यांच्या काळात अशी भाडेवाढ करणे, अधिभार लावणे असे प्रकार केले जात आहेत. हे अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे. 'धर्मनिरपेक्ष' म्हणवल्या जाणाऱ्या या शासनप्रणालीत सर्व धर्मांना समान न्याय मिळावा, असे अपेक्षित असतांना हिंदूबाबतीत मात्र नेहमी भेदभाव केला जातो, परिणामी हिंदु समाजाच्या मनात अन्यायाची भावना निर्माण होत आहे.

राज्य परिवहन खात्याने घेतलेल्या या भाडेवाढीच्या निर्णयाचा लाखो भाविकांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. हा निर्णय म्हणजे धार्मिक पक्षपात असून जाणीवपूर्वक हिंदूंच्या धार्मिक उत्सवावर बंधने आणण्याचा प्रकार असल्याची भावना हिंदु समाजामध्ये निर्माण झाली आहे.

**यासाठी आम्ही पुढील मागण्या करत आहोत –**

१. शासनाने मकरसंक्रांतीच्या निमित्ताने केलेली दरवाढ तातडीने मागे घ्यावी.

२. या धार्मिक उत्सवांच्या ठिकाणी भाविकांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

३. भारतीय नागरिकांना धर्माच्या आधारे सुविधा न देता, सर्व नागरिकांना समान सुविधा मिळाव्यात, समान अधिकार मिळावेत, यासाठी देशात 'समान नागरी कायदा' लागू करावा.

आपला नम्र,

**प्रत :**

**१. राज्यपाल, आंध्रप्रदेश**

**२. केंद्रीय परिवहन मंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली.**

स

.

प